ग्रामीण महिलांचे सामाजिक व राजकीय सक्षमीकरण एक अध्ययण

संशोधक विद्यार्थी

मुसळे योगेश विश्वानाथ

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

मो. नं. 9923264282

प्रस्तावना :

भारत हा खेडयाचा देश म्हणून ओळखला जातो. खेडयातील म्हणजे ग्रामीण भागातील जनता ही शेतीवर अवलंबून असल्यामुळे हा देश कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. देशातील 70 टक्के पेक्षा ज्यास्त जनता ग्रामीण भागात वास्तव्य करुन राहते. भारताचा खज्या अर्थाने सर्वांगीन विकास करायचा असेल तर प्रथम ग्रामीण भागाचा विकास करणे आवश्यक आहे. म्हणूनच महात्म गांधी यांनी 'ग्राम स्वराज्यांची' संकल्पना मांडली व खेडयाकडे चला असा संदेश दिला होता. महात्मा गांधी म्हणाले होते की, "जर खेडे नष्ट झाले तर भारत देश नष्ट होईल म्हणून देशाचा विचार करताना ग्राम विकासाला प्राधान्य दिले पाहिजे."

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये स्त्री-पुरुष यांच्या विषमतेची दरी पूर्वीपासून पसरलेली आहे, असे दिसून येते. प्राचीन काळापासून स्त्री ही पुरुषाची सुख-दु:खाची समान वाटेकरी ठरत आली आहे. प्राचीन काळात भारतात महिलांना पुरुषाना समान अधिकार प्राप्त होते. महिलांचा मान-सन्मान केला जात असे. याबाबतचे पुरावे आपणांस धार्मिक, ग्रंथ, चालीरिती, संस्कृती यातून पहावयास मिळतात. जसे गार्गी, लोपमुद्रा या विदुषी म्हणून विद्वान सभेमध्ये मानाची जागा मिळत असे. स्त्रीयां गुरुकुलात शिक्षण घेण्यासाठी जात असत. प्राचीन काळी शिक्षण, विवाह यासारख्या विधी बाबत स्त्रीचे मत महत्त्वपूर्ण मानले जात असे.

मध्ययुगीन कालखडात महिलांच्या हक्कावर मर्यादा आल्या. या कालखंडात अत्याचार होत होते. त्यांची विक्री केली जात असे. स्त्रियांची सुरक्षितता या काळात लयास गेली. या असुरक्षिततेच्या कारणामुळे त्यांचे कार्यक्षेत्रही घरापुरतेच मर्यादित राहिले.

आधुनिक कालखंडात समाज सुधारकांच्या प्रयत्नामुळे स्त्रीयां शिक्षित होवू लागल्या. स्वातंत्र लढयात त्यांनी पुरुषाप्रमाणेच महत्वाची भूमिका निभावली होती. त्यामुळे स्वातंत्र्य लढयातील त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरली आहे. भारतीय संविधानामुळे स्त्रियांना समानतेचा दर्जा देण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे प्रयत्न केले गेले. त्यात प्रामुख्याने स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये त्यांना 50 टक्के आरक्षण दिले जात. नोकज्यामध्ये देखील त्यांना आरक्षण प्राप्त झाले आहे. शिक्षणाच्या संदर्भात विविध योजनामुळे स्त्रियांच्या शिक्षणात देखील वाढ झालेली आहे. परंतु वास्तविक आजही स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. भातीय समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान असल्यामुळे फारच थोडया प्रमाणात त्यातल्या आर्थिकदृष्टया संपन्न असलेल्या कुटुंबातील स्त्रीयां ह्या स्वतंत्र जीवन जगत आहेत. भारताचा विकास साध्य करण्यात, महासत्ता बनविण्यात स्त्रीयां ही महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. त्यामूळे स्त्रियांना सक्षम करण्यासाठी त्यांना सामाजिक हक्क, शौक्षणिक हक्क्, राजकीय हक्क, धार्मिक हक्क, सांस्कृतिक हक्क व आर्थिक हक्क दिले जावेत. यामुळेच स्त्रियांची स्थिती सुधारेल व त्या सक्षम बनतील.

महिला सक्षमीकरणाची संकल्पना :-

महिला सक्षमीकरणाची संकल्पना ब्राझीलच्या 'फावलो फेरे' या शिक्षणतज्ञांच्या कल्पनेतून उदायास आली आहे. स्त्रियांनी आपल्या प्रजोत्पादनावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता असणे हे महिलांच्या सक्षमीकरणाचे आणि समतेचे मुलभूत तत्त्व होय. महिलेला जेंव्हा तिच्या कुटुंबाचे नियोजन करता येईल,

तेंव्हा तिला तिच्या उर्वरित आयुष्याचे ही नियोजन करता येईल. महिला सशक्त असेल तर तिची उत्पादकता ही वाढेल. स्त्री आणि पुरुषामध्ये समानता असणे किंवा लिंगभाव समानतेला चालना देणे हा महिलांच्या सक्षमीकरणाचा अत्यंत महत्तपूर्ण आयाम आहे.

भारताच्या पंचवार्षिक योजनांचा प्रवास लक्षात घेतला तर एक बाब स्पष्टपणे पुढे येते की, स्त्रीचा विचार किंवा स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित करण्याचा विचार 9 व्या पंचवार्षिक योजनेपासून अधिक गतिमान झाली. महिला या विकासाच्या वाटेकरी आहेत. परंतु त्या विकासाच्या समान हिस्सेदारआहेत. अशी व्युहरचना 9 व्या पंचवार्षिक योजनेत करण्यात आली आहे. कर्नाटक हे भारतातील पहिले राज्य ज्यांनी लिंगभावावर आधरित अर्थसंकल्प सार्वजनिक खर्चामध्ये लागू केला आहे. केरळ व तामिळनाडू सारख्या राज्यांनी ही महिलांच्या शिक्षण, आरोग्य, रोजगार यासाठी लिंगभावावर आधारित अर्थसंकल्प राबवून विकास संपादन केला आहे.

सक्षमीकरणाची व्यख्या:

1. "सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांना त्यांच्यातील आत्मविश्वास आणि अंतर्गत शक्ती यात वाढ करण्याची गरज होय."

2. "सक्षमीकरण म्हणजे अशी प्रक्रिया आहे की, ज्याद्वारे ज्यांना जीवन जगण्याची संधी नाकारण्यात आल्या होत्या. त्या त्यांना परत करणे होय."

संयुक्त राष्ट्राचा विकास कार्यक्रम आणि महिला सक्षमीकरण :

संयुक्त राष्ट्राचा विकास कार्यक्रमाने UNDP लिंगभाव समता आणि महिलांच्या सक्षमीकरणावर केवळ मानवी हक्काचा भाग म्हणून भर दिलेला नाही तर सहाय्यक विकास उद्दिष्टे आणि शास्वत विकास साध्य करण्याचा मार्ग म्हणून या बाबींवर भर दिला आहे. न्यामंडळापासून ते सनदी सेवा आणि खाजगी क्षेत्र ते नागरी समाजापर्यंतच्या सर्व स्तरावरील शासन व्यवहार संस्थामध्ये महिलांच्या आवाजाला स्थान प्राप्त व्हावे. जेणेकरुन त्या पुरुषाच्या बरोबरीने सार्वजनिक संवाद आणि निर्णय निर्धारणामध्ये सहभागी होतील, अशी हमी देण्याकरिता UNDP कार्यरत आहे.

महिला सक्षमीकरणाचे महत्त्वपूर्ण घटक :-

1. प्रजोत्पादन आरोग्य :

प्रजोत्पादन आरोग्याबाबत पुरुषाच्या तुलनेत या महिलांच्या समस्या गंभीर असतात. परंतू त्यांची अधिक हेळसांड होत असते. महिलांना त्यांच्या प्रजोत्पादन आरोग्य ते संरक्षण करता येत नाही. कारण लिंगभाव भेदभावावर आधारित व्यवस्थेमध्ये त्यांना योग्य माहिती, सेवा पुरविली जात नाही. त्यामुळे महिलांच्या आरोग्य आणि जीवितांच्या हक्कांचे उल्लेघन होते.

2. नौसर्गिक संसाधानाची जबाबदारी :

विकसनशील राष्ट्रातील महिलावर सर्वसाधारणपणे पाणी, अन्न आणि इंधन उपलब्ध करुन देण्याची तसेच संपूर्ण कुटुंबाच्या आरोग्य आणि आहाराकडे लक्ष देण्याची जबाबदारी असते.

3. आर्थिक सक्षमीकरण :

पुरुषांच्या तुलनेत महिलांच्या गरीबीचे प्रमाण अधिक आहे. महिलांना कुटुंबामध्ये आणि समुदायामध्ये विनावेतन असणाज्यास्वरुपाची अनेक कामे करावी लागत असल्याने मोठया प्रमाणात आर्थिक विषमतेला सामोरे जावे लागते. त्यामुळे महिलांच्या सक्षमीकरणातील एक महत्त्वाचा घटक म्हणजे त्यांचे आर्थिकदृष्टया सक्षमीकरण होय.

4. शौक्षणिक सक्षमीकरण :-

जागतिक 2/3 निरक्षर व्यक्ती ह्या महिला आहेत. बालमृत्यूचे प्रमाण कमी आणि प्रजोत्पादकता कमी असणे या बाबींशी महिलांच्या शिक्षणाचा घनिष्ट संबंध आहे.

5. राजकीय सक्षमीकरण :-

सामाजिक आणि कायदेशीर संस्थेमूळे आजही महिलांना मुलभूत कायदेशीर आणि मानवी हक्क, जमीन आणि इतर संसाधनापर्यंत नियंत्रण, रोजगार आणि अर्थोत्पादन आणि सामाजिक व राजकीय सहभाग इ. क्षेत्रातील समानतेची हमी मिळत नाही. सामाजिक न्यायाच्या प्रेरणेतून महिलांना राजकीय प्रतिनिधीत्त्वामध्ये राखीव जागा प्राप्त झाल्या तरी संबंधीत पदाचे अधिकार उपभोगण्याची त्यांची क्षमता विकसित वा मान्य केली जात नाही.

महिला सक्षमीकरण :

सेन आणि बाटलीवाला यांच्या मते सक्षमीकरण म्हणजे आंतरिक क्षमता, आधिक आत्मविश्वास यामध्ये वाढ होणे आणि एखाद्याच्या आंतरिक जाणिवामध्ये झालेल्या बदलामुळे ती व्यक्ती बाह्य अडथळ्यावर मात करण्यास सक्षम होणे. महिलांचे सक्षमीकरण म्हणजे महिलांच्या जगण्याच्या संदर्भामध्ये बदल होणे ज्यामुळे समृध्द असे मानवी जीवन जगण्याच्या तिच्या क्षमता वाढणे होय.

महिलाचे सामाजिक सक्षमीकरण :

भारतातील महिलांने सक्षमीकरण मोठया प्रमाणात विधि घटकावर अवलंबून आहे. शौक्षणिक स्थिती, राजकीय स्थिती, वयोमान इ. महिला सक्षमीकरणाची राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक पातळीवरील धोरणे, आरोग्य शिक्षण, आर्थिक संधी, लिंगभाव आधारित हिंसा आणि राजकीय सहभगा इ. क्षेत्रात आहेत. राष्ट्रीय महिला सबलीकरण धोरणाची घोषणा 20 मार्च 2001 रोजी जाहीर केले आणि त्यांचा उद्देश हा होता की, महिलांची प्रगती, विकास आणि सबलीकरण घडवून आणण्यासाठी महिला विरुध्द सर्व स्वरुपातील भेदभाव दूर करण्यासाठी न्यायिक व्यवस्थेने बळकटीकरण करणे व निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांना संधी प्रदान करणे आणि विकास प्रक्रियेत जेंडर प्रकरणी विषयांना मुख्य धारेमध्ये आणणे व राव्हाच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक जीवनात महिलांना त्यांच्या पूर्ण क्षमतेचा विकास करता येण्यासाठी सक्षम बनविण्यासाठी सकारात्मक धार्मिक व सामाजिक धोरणद्वारे वातावरण निर्मिती करणे आणि महिलांना राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि नागरी अशा सर्व प्रकारचे मानवाधिकार उपलब्ध करुन देणे. आरोग्य सेवा, सर्व स्तरावरील गुणवतेचे शिक्षण करिअर व व्यावसायिक आरोग्य व सुरक्षा, सामाजिक सुरक्षा, सार्वजनिक कार्यालये इ. क्षेत्रात महिलांना समान संधी उपलब्ध करुन देणे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविणे, सुक्ष्म वित्तपुरवठा करणे, संघटित व असंघटित क्षेत्रातील महिलांसाठी बृहतमयी धोरण ठरविणे, कृषी क्षेत्रातील स्त्रीयांसाठी योजना राबविणे इ. धोरणात्मक निर्णय महिला सक्षमीकरणासाठी घेण्यात आले आहेत.

महिला राजकीय सक्षमीकरण :

भारतातील ग्रामीण महिलांचे राजकीय सक्षमीकरण मोठया प्रमाणात व्हावे यासाठी ग्रामीण महिलांनी ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत सहभागी व्हावे म्हणून 1959 मध्ये बलवंतराव समितीने सुध्दा महिलांच्या प्रतिनिधीत्वासाठी विशेष प्रयत्न केले. 73 व्या घटना दुरुस्तीनंतर पंचायती व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्रियांसाठी 1/3 आरक्षणाची व्यवस्था करण्यात आली. हे आरक्षण फक्त राजकीय नेतृत्त्व सुरक्षित करण्यासाठीचे नव्हते तर स्त्रियांमधील नेतृत्त्व गुणांना वाव देण्याचा व प्रोत्साहन देण्याचा तो प्रयत्न होता. मलिंच्या विकास प्रक्रियेत ऑगस्ट 1990 मध्ये केंद्र शासनाने केलेली राष्ट्रीय आयोगाची स्थापना हा महत्त्वाचा टप्पा आहे. या आयोगाच्या उद्दिष्टात स्त्रियांना विकासाच्या सर्व क्षेत्रात संरक्षण देणे व विकासाला चालना देणे हा ही एक भाग आहे. भारतातील स्त्रिया, त्यातही ग्रामीण समाजातील व बहुजन समाजातील स्त्रिया वर्षानुवर्ष घराच्या चार भिंतीच्या आतच अडकुन पडल्या होत्या चुल आणि मुल त्या पलिकडे स्त्रियांचे कार्यक्षेत्र नाही. यामुळे या स्त्रियांना सार्वजनिक जीवनाचा कसलाही अनुभव नाही. राजकीय विकासाच्या प्रक्रियेत त्यांचा सहभाग नाही. ग्रामीण विकासाची दिशा स्त्रियांना सोबत घेऊन चालल्या शिवाय निश्चित होणार नाही. त्यामुळे राजकीय धोरणांत ग्रामीण महिलांचे सबलीकरण करणे अतिशय महत्त्वाचे आहे. ग्रामीण महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील ओबीसी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्यांक गट, खुल्या प्रर्वगातील स्त्रियांसाठी 50 टक्के आरक्षण सुरु करण्यात आली, ग्रामीण भागातील स्त्रियांचे राजकीय सबलीकरण करुन यांचा सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न केले.

महिला सक्षमीकरणासाठी विविध शासकीय योजना :-

1. महिला आर्थिक महामंडळ :

याची स्थापना 24 फेब्रुवारी 1975 (महाराष्ट्र शासन) 20 जानेवारी 2003 मध्ये महिला विकासाची राज्यस्तरीय शिखर संस्था म्हणून घोषित करण्यात आली. या योजनेचे ध्येय हे आहे की, विकास प्रक्रियोतून महिलांसाठी सामाजिक, आर्थिक व राजनौतिक न्याय प्रस्थापित करणे. महिलामध्ये आत्मविश्वास वाढविणे. स्त्रीच्या विकासाठी स्वयंसाहाय्य बचन गटांना संस्थात्मक स्वरुप देवून बळकट करणे.

2. महिला समृध्दी योजना 1993 :

ग्रामीण महिलांना आर्थिक सुरक्षा व प्रोत्साहन देणे. तसेच ग्रामीण महिलांना सक्षम व निर्भर बनविणे. 18 वर्षावरील महिला बचत खाते ग्रामीण पोस्ट ऑफिसमध्ये सुरु करु शकतात. किमान ठेव दरात ते 4 पटीत ते कमाल ठेव 300 रु पर्यंत.

3. महिला समानता योजना 1989 :

या योजनेतमध्ये महिलांचे यशस्वी सशक्तीकरण राष्ट्रीय शौक्षणिक धोरणाच्या उदिष्टांना एका ठोस निश्चित माध्यातून कार्यक्रमात रुपांतरित करणे. शिक्षणाच्या माध्यामातून महिला समानतेने उदिष्ट साध्य करण्यासाठी योग्य वातावरण निर्माण करणे आणि जेथून महिला ज्ञान माहिती मिळवू शकतील व त्याद्वारे त्यांच्या स्व विकासात व समाजाच्या विकासात त्या सकारात्मक भूमिका पार पाडतील.

4. माझी कन्या भाग्यश्री योजना, 5. बेटी बचाव बेटी पढाव योजना, 6. मनोध्येय योजना, 7. किशोरी शक्ती योजना, 8. स्वाधार योजना, 9. मातृत्त्व सहयोग योजना, 10. स्त्री स्वाभीमान योजना, 11. सुकन्या योजना 12. देवदासी कल्याण योजना, 13. इंदिरा गांधी मातृत्त्व सहयोग योजना अशा अनेक प्रकारच्या योजना लागू केल्या आहेत.

ज् प्रतिसाद ॲप (asic) :- महिला सुरक्षेच्या दृष्टिने प्रतिसाद हे ॲप अत्यंत उपयोगी आहे.

ज् हेल्पलाईन (कंट्रोल रुम) :- महिलांसाठी हेल्पलाईन क्रमांक 1091, संकटकालीन महिला, जेष्ठ नागरिक व बाल कामगारासाठी 103 हा क्रमांक आहे. महिलांना सक्षम करण्यासाठी प्रत्येक ठिकाणी त्यांनी सुरक्षितता महत्त्वाची आहे. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ कायदा ऑनलाईन तक्रारीसाठी सविधा, 181 महिलांसाठी हेल्पलाईन मुळे महिला सक्षम होणार आहेत. तिहेरी तलाक बंदीला लोकसंख्येने मंजूरी दिल्यानंतर केंद्र सरकारने अध्यादेश काढला आहे.

समारोप :

भातरीय संस्कृतीमध्ये नारीशक्तीची संकल्पना पुरातन काळापासून अस्तित्त्वात आहे. भारतात अनादी काळापासून देवीच्या विविध रुपाची उपासना करण्याची पध्दत आहे. पूर्व भारतात काली, मौसासूर, मर्दिनी आणि केरळमध्ये भागवती या सारख्या विविध रुपात देशभरात देवीची उपासना करण्यात येते. शक्तीच रुप म्हणून देवीची उपासना आणि आराधना करण्यात येते. परंतु ही नाण्याची एक बाजू आहे. दुसज्या बाजूला महिलांना त्यांच्या जीवनात आणि कुटुंबात मत व्यक्त करण्यात स्वातंत्र्या पण दिल जात नाही. त्यांच जीवन हे पुरुषाच्या अधिन असते. त्यांच्या आशा आकांक्षा इच्छांना महत्त्व दिले जात नाही.

संदर्भ सूची :

1. पाटील बी.बी. महाराष्ट्र शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन कोल्हापूर.

2. महिला सशक्तिकरण प्रकाशक ज्योती प्रकाशन 187, बरकत नगर, टोंका फाटक जयपुर-302015

3. स्त्री : आत्मभान ते सबीलकरण एक प्रवास - डॉ. अरुंधती पाटील, अरुणा प्रकाशन, लातूर.

4. मेघना मधुकर गोरे- शोधनिबंध महिला बचतगट आणि महिलाचे सबलीकरण स्मरणीका प्रकाशन डॉ. विजया कामळजकर.

5. सामाजिक संशोधन पध्दती – डॉ. प्रदिप आगलावे.

6. प्रा. पाटील व्ही. बी. महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था के. सागर पब्लिकेशन पुणे.

7. भातरीय स्त्री– केळकर मीना– निर्मित प्रकाशन पुणे.

8. निबांळकर विजय (2000) सबला – स्त्री अभ्यास स्वरुप आणि दिशा, जी. के. इन्स्टीटयुट गारगोटी कोल्हापूर.